# <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :- १०५/२०२२/धुळे**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. कल्पेश राजेंद्र देव<br>रा. १५६, बाहुबली नगर, साक्री रोड, धुळे,<br>ता.जि.धुळे - ४२४००१. | पोलीस निरीक्षक,<br>धुळे शहर पोलीस स्टेशन,<br>धुळे, ता.जि. धुळे |

**<u>सुनावणी दिनांक १४/०७/२०२३</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ०२/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १४/०७/२०२३ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित असुन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ०२/०३/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, त्यांनी दि ०८/०१/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये शहर पोलीस स्टेशन, धुळे यांचेकडे दि ०८/०१/२०२२ रोजीचे शहर पोलीस स्टेशन धुळे येथील सी.सी.टी.व्ही फुटेज मागितले होते. त्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ अन्वये सदरची माहिती पुरविता येणार नाही असे शहर पोलीस स्टेशन, धुळे यांनी कळविले आहे. सदरची माहिती माझी बहिण कु. भाग्यश्री देव हिच्या मिसिंग प्रकरणाशी संबंधित असल्याने सदरची माहिती मला मिळावी.

३) सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीनी असे नमूद केले की, तक्रारदार यांनी दि. ०८/०१/२०२२ च्या माहिती अर्जातील मुद्या क्र १ व ३ अन्वये सी.सी.टी.व्ही. फुटेज ची माहिती मागितली आहे. सदरची माहिती ही कार्यालयातील गोपनियता भंग करणारी व पोलीस ठाण्यातील अधिकारी/ कर्मचारी व आरोपींचे जीवितास धोका उत्पन्न होईल अशी आहे. त्यामुळे सदरची माहिती देता येत नाही.

४) सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व प्रस्तुत प्रकरणी आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे विचारात घेता, पोलीस निरीक्षक, धुळे शहर पोलीस स्टेशन यांनी तक्रारदारास दि. १७/०१/२०२२ च्या पत्रान्वये मुद्या क्र २ ची माहिती पुरविली असून मुद्या क्र १ व ३ ची माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ अन्वये पुरविता येत नाही असे कळविले आहे. मुद्या क्र १ व ३ ची माहिती ही सी.सी.टी.व्ही फुटेज संदर्भातील असुन कार्यालयातील गोपनियता भंग करणारी व पोलीस ठाण्यातील अधिकारी/ कर्मचारी व आरोपीचे जीवितास धोका निर्माण करणारी आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता, तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी दि १७/०१/२०२२ च्या पत्रान्वये माहिती व वस्तुस्थितीदर्शक दिलेले उत्तर योग्य असल्याने तक्रारदार यांची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

प्रस्तुत तक्रार क्रमांक १०५/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भुपेंद्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

भा.हे.ओ-४२८

0 6 MAR 2024